महिला व बालकल्याण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाजसेविका व स्वयंसेवी संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-अहोपु-२०२३/प्र.क्र.७६ (ई-११३७२४३)/का-१०
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक- २७ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-

१. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अदेपु-१०९९/प्र.क्र.८२३/का-०२, दि.१६.०६.२०००,
२. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अहोपु-२०२३/प्र.क्र.७६/का-१० (ई-११३७२४३), दि.०४.११.२०२५.

प्रस्तावना -

सदाचार, सदविचार, धर्मनिष्ठा, त्याग, समर्पण, दुरदर्शी, धोरणी, मुत्सद्दी अशा सर्वगुणसंपन्न स्त्रियांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव प्राधान्याने घेतले जाते. या सर्वाभिमुख व्यक्तीमत्वाचा आदर्श जोपासून स्त्रियांनी पुढे यावे, यासाठी महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची नोंद घेऊन त्यांना सन्मानित करण्याबाबतचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार महिला व बाल विकास विभागांतर्गत राज्यातील समाजसेविका व स्वयंसेवी संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

२. महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाजसेविकांना सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०४.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार घोषित करण्यात आले आहेत.

३. महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाजसेविका व स्वयंसेवी संस्थांना सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी **राज्यस्तरीय** व **विभागस्तरीय** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी खालील समाजसेविका व स्वयंसेवी संस्थांना **राज्यस्तरीय व विभागस्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार** घोषित करण्यात येत आहेत :-

राज्यस्तरीय पुरस्कार				
अ.क्र.	सन २०२०-२१	सन २०२१-२२	सन २०२२-२३	सन २०२३-२४
१	**श्रीमती वनिता गजानन घुमे,** भद्रावती, जि.चंद्रपूर	**श्रीमती तारामती बद्रीनाथ जायभाये,** मु.पो. वढव, ता.लोणार, जि.बुलढाणा.	**श्रीमती वंदना रामदास तोरवणे,** तळोदा, जि.नंदुरबार	**श्रीमती सुजाता यशवंत माने,** रा.कन्हेरी कॉलनी, लातूर.

विभागस्तरीय पुरस्कार					
अ. क्र.	विभाग	सन २०२०-२१	सन २०२१-२२	सन २०२२-२३	सन २०२३-२४
१	पुणे विभाग	स्वयंप्रेरिका ग्रामीण महिला संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर	-----	प्रिन्स शिक्षण संस्था, येवलेवाडी, ता.वाळवा, जि.सांगली	भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, २५/१०, यशवंत रेसिडेन्सी, सांगली रोड, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.
२	कोकण विभाग	भारतीय कष्टकरी रयत सेवा संस्था, (भाकर) लांजा, ता.लांजा जि. रत्नागिरी.	-----	रेस्क्यु फाऊंडेशन, बोईसर, लाला लोंडेगाव, फुलाचा पाडा, नागझरी जवळ, बोईसर, ता.पालघर, जि.पालघर.	-----
३	नाशिक विभाग	संस्कृती बहु. सेवा मंडळ, नंदुरबार ता.जि.नंदुरबार	मा.जयंतराव पाटील बहुउद्देशीय संस्था, रामेश्वर, ता.अमळनेर, जि.जळगाव	-----	-----
४	नागपूर विभाग	तेजस्विनी बहुउद्देशीय सेवाभावी विकास संस्था, कवडस रोड, नागपूर.	-----	आरोग्य प्रबोधनी, आमगाव बुटी, ता.देसाईगंज, जि.गडचिरोली.	-----
५	अमरावती विभाग	हिरकणी महिला उत्कर्ष प्रतिष्ठान, चिखली, जि.बुलढाणा.	-----	साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु. मंडळ, पातुर, ता.पातुर, जि.अकोला.	क्षितीज सामाजिक संस्था, सुकडे नगर, शेलुबाजार, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.
६	छत्रपती संभाजीनगर विभाग	मधुमती महिला मंडळ, लातूर, जि. लातूर.	सत्यमेव जयते सेवाभावी संस्था, ढोकी, ता.जि.धाराशिव	उगम ग्रामीण विकास संस्था, उमरा, कळमनुरी, जि.हिंगोली.	जय किशन शिक्षण संस्था, २५, नवभारत हौसिंग सोसायटी, एन-८, सिडको, छत्रपती संभाजीनगर.

२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी सदर पुरस्कारार्थी व स्वयंसेवी संस्थांकडून आवश्यक ती प्रमाणपत्रे प्राप्त करुन तद्नंतरच संबंधितांना पुरस्कार वितरीत करण्याची दक्षता घ्यावी.

३. सदरहू पुरस्कार पुरस्कारार्थीना प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२७१६२०४१८९३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL DEORAO SARDAR

Digitally signed by SUNIL DEORAO SARDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=778B75C2C14BADBE6832D77601CF425AA7979B907650965C83919DBA7DC458C7, cn=SUNIL DEORAO SARDAR
Date: 2026.08.27 16:21:59 +05'30'

(सुनिल सरदार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्री.व यु.क, अ.वि.व औ.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा/ अपिल शाखा), मुंबई /औरंगाबाद / नागपूर,
१६. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
१७. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
१८. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१९. सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी,

२०. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,

२१. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,

२२. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,

२३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,

२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२५. उपायुक्त (महिला विकास/ बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,

२६. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास,

२७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

२८. सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद,

२९. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी, आदिवासी व ग्रामीण,

३०. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

३१. सर्व पुरस्कारार्थी/ स्वयंसेवी संस्था (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत),

३२. निवड नस्ती/का-१०.